महाराष्ट्र विकास प्रशासन संस्था, पुणे
नोंदणीकृत संस्थेमध्ये रूपांतर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आयडीए-१०८६/४७/१७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ८ मे, १९८६.

पहा : १] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एससी-१८८४/९९९/६, दिनांक २४ मे, १९८४,
२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एससी-१८८४/९९९/[ए]/६, दिनांक २४ मे, १९८४,
३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:आस्थापना-११८५/१६३५/[प्र.क्र. ६/८५]/१७, दिनांक २०/२/१९८६.

<u>शासन निर्णय</u> :-

मुंबई येथील प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय विसर्जित करून त्याऐवजी महाराष्ट्र विकास प्रशासन संस्थेची स्थापना पुणे येथे १ जून, १९८४ रोजी करण्यात आली. या संस्थेतर्फे विकास प्रशिक्षणाचे विशेषत: ग्रामीण विकासाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे काम केले जाते. अन्य राज्यातील आय. ए. एस. व अन्य सेवेतील अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्थाही केंद्र शासनातर्फे या संस्थेत करण्यात येते. या संस्थेला तिचे उद्दिष्ट योग्य रितीने व सुलभपणे साध्य करता यावे या दृष्टीने अधिक प्रमाणात आर्थिक व धोरणात्मक स्वायत्तता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, महाराष्ट्र विकास प्रशासन संस्था, पुणे या संस्थेचे <u>सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० या अधिनियमाखाली नोंदणीकृत</u> संस्थेमध्ये रूपांतर करण्यात यावे. हे रूपांतर केल्यानंतर महाराष्ट्र विकास प्रशासन संस्थेसाठी अंदाजपत्रकात केलेली आर्थिक तरतूद संस्थेला अनुदान [ग्रँट-इन-एड] या स्वरूपात देण्यात यावी. नियोजित संस्थेचे संस्थापन समयलेख [मेमोरँडम ऑफ असोसिएशन] शासनाने स्वतंत्रपणे मंजूर केला आहे. संस्थेचे सेवानियम (सर्व्हिस रूल्स) हे संबंधीत विभागांशी विचारविनिमय करून तयार करण्यात यावेत. तसेच महाराष्ट्र विकास प्रशासन संस्थेला दिलेली जमीन व इतर मालमत्ता यांचे नवीन सोसायटीच्या नावे हस्तांतरण करण्यात यावे.

२. ज्या दिनांकापासून महाराष्ट्र विकास प्रशासन संस्थेचे नोंदणीकृत संस्था म्हणून प्रत्यक्षात नोंदणीकरण होईल त्या दिनांकापासून संस्थेच्या आस्थापनेवरील सर्व पदे नोंदणीकृत संस्थेकडे वर्ग करण्यात यावीत. तसेच ही पदे धारण करणाऱ्या सर्व पदधारकांच्या सेवा एक वर्षाच्या कालावधीसाठी संस्थेकडे तिच्या अधिकृत

...२

नोंदणी दिनांकापासून वर्ग करण्यात याव्यात. संस्थेचे सर्व्हिस रूल्स प्रसृत झाल्यावर संबंधी पदधारकांना संस्थेच्या आस्थापनेवर पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

३. संस्थेसाठी १९८६-८७ च्या अंदाजपत्रकात जी तरतूद केली आहे, त्यापैकी एप्रिल ते जुलै, १९८६ पर्यंत तरतूद संस्थेस यापूर्वीच लेखानुदान स्वरूपात देण्यात आलेली आहे. या लेखानुदान तरतूदीपैकी मे ते जुलै, १९८६ या कालावधीसाठी असलेली तरतूद त्या संस्थेस सहायक अनुदान म्हणून मंजूर करण्यात आली आहे. १९८६-८७ च्या अंदाजपत्रकास विधानमंडळाची मान्यता मिळाल्यावर महाराष्ट्र विकास प्रशासन संस्थेसाठी असलेली उर्वरित तरतूद सहायक अनुदान म्हणून मंजूर करण्यात यावी.

४. हा शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर ९९५/व्यय-४ दिनांक ८ मे १९८६, व्दारे त्या विभागाच्या अनुमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म. कृ. जोशी ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, महाराष्ट्र विकास प्रशासन संस्था, पुणे,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
वित्त विभाग,
नियोजन विभाग,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्र. १९, २५, २६,
निवड फाईल.

एसडी.